**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**बुधवार दिनांक २८ मे २०२५**

**ठळक बातम्या**

1. **महाराष्ट्र आणि मध्य प्रदेश मध्ये दोन मल्टी ट्रेकिंग रेल्वे योजनांना केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी, वर्धा - बल्लारशा चौथ्या लाईनचा समावेश.**
2. **राज्यात पावसामुळे अनेक ठिकाणी मालमत्तेचं नुकसान, आठ जणांचा मृत्यू, अकोल्यात १३० मिलीमिटर पावसाची नोंद.**
3. **स्वातंत्र्यवीर विनायक सावरकर याच्या जयंती निमित्त विविध कार्यक्रमांचं आयोजन.**
4. **भंडाऱ्यामधे कृषी तंत्रज्ञान माहिती केंद्रात १२९ मेट्रिक टन बोगस खतांचा साठा जप्त.**

-----------------------------------------------------

**वर्धा आणि बल्लारशा चौथी लाईन**

**केंद्रीय मंत्रिमंडळाने महाराष्ट्र आणि मध्य प्रदेश मध्ये दोन मल्टी ट्रेकिंग रेल्वे योजनांना मंजुरी दिली आहे. या योजना नंतर रतलाम -नागदा तिसरी आणि चौथी लाईन तसंच वर्धा आणि बल्लारशा चौथी लाईन यांचा समावेश करण्यात आला आहे. 3 हजार 399 कोटी खर्चून या योजनेचे काम पूर्ण करण्यात येणार असून वर्ष 2029-30 पर्यंत या योजना पूर्ण करण्यात येतील. यामुळे भारतीय रेल्वेच्या सेवांमध्ये 176 किलोमीटरची वाढ होणार असून जवळजवळ 784 गावांपर्यंत आणि 19.74 लाख लोकांपर्यंत रेल्वे कनेक्टिव्हिटी वाढणार आहे. या योजनेदरम्यान 74 लाख मानव दिवसांचा प्रत्यक्ष रोजगार निर्माण होणार आहे. याशिवाय या क्षेत्रात दळणवळणाचे दर कमी होतील आणि कार्बन उत्सर्जनात देखील घट होणार आहे. दरम्यान रेल्वे चा कार्बन उत्सर्जन कमी करण्यात मोठा वाटा असून दळणवळण विषयक दर नियंत्रणात ठेवण्यात देखील रेल्वेची महत्वाची भूमिका असल्याचे रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव म्हणाले....**

***(होल्ड बाईट -अश्विनी वैष्णव)***

***इस साल भारतीय रेलवे वर्ल्ड में सेकंड लार्जेस्ट कार्गो कैरिंग रेलवे बनी है 1.6 बिलियन टन्स कार्गो कैरी किया पिछले साल और ये एक डिसैसिव जम्प है और इसका एनवायरनमेंट पे बहुत बड़ा बेनिफिट मिला है बिकॉज़ व्हेन यू कंपेर हायवे***

*एंड रेलवे सीओ टू एमिशन्स आर प्रक्टिकली 95% लेस इन रेलवेज और कंट्री की लोजिस्टिक्स कॉस्ट में भी इसका बेनिफिट मिलता है बिकॉज़ कॉस्ट बाय ट्रांसपोर्टेशन जो रेलवे और हायवे को कंपॅरिज़न करो तो रेलवे की कॉस्ट आधे से कम है।*

---

**पंतप्रधान नरेंद्र मोदी**

**पंतप्रधान नरेंद्र मोदी २९ आणि ३० मे रोजी सिक्कीम, पश्चिम बंगाल आणि बिहारच्या दौऱ्यावर आहेत. सिक्कीम इथं सिक्कीम ॲट फिफ्टी कार्यक्रमात पंतप्रधान सहभागी होतील. तर, उत्तर प्रदेशातील कानपूर इथं पंतप्रधानांच्या हस्ते २० हजार ९०० कोटी रुपयांच्या विविध विकास प्रकल्पांचं उद्घाटन आणि भूमीपूजन करण्यात येणार आहे. बिहारमध्ये पंतप्रधान करकत इथं ४८ हजार ५२० कोटी रुपयांच्या विकासकामांचं उद्घाटन आणि पायाभरणी करतील. तर, पश्चिम बंगाल दौऱ्यात पंतप्रधानांच्या उपस्थितीत अलिपूरदूर इथं शहर गॅस वितरण प्रकल्पाची पायाभरणी करण्यात येणार आहे.**

---

**बहुपक्षीय प्रतिनिधिमंडळ**

**जनता दलाचे खासदार संजय झा यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळं आज इंडोनेशियाची राजधानी जकार्ता इथं पोहोचलं. सिंगापूर, दक्षिण कोरिया आणि जपानमधले त्यांचे कार्यक्रम यशस्वीरित्या पूर्ण केल्यानंतर, हे शिष्टमंडळ आता ऑपरेशन सिंदूर आणि दहशतवादा विरुद्ध भारताची भूमिका इंडोनेशियच्या नेतृत्वासमोर मांडणार आहे. खासदार संजय झा यांनी या दरम्यान देशाची दहशतवाद विरोधी भूमिका स्पष्ट केली -**

**(*होल्ड बाइट - संजय झा*)**

*सारी पार्टी एक साथ खड़ी है। इस लड़ाई में देश में भी लोग मान लिया है कि इनफ इज इनफ हो गया। अब अगर इस तरह का घटना होगा तो हम केवल नोट एक्सचेंज नहीं करेंगे। इन्फॉर्मेशन शेयर नहीं करेंगे। वी विल गो डीप इनसाइड एंड वी विल हिट यू हिट यू लाइक एनीथिंग ये एक रिजॉल्व लेकर के गये है। दुनिया में भी हम लोग जाकर के यही बता रहे हैं।*

**हे शिष्टमंडळ इंडोनेशिया सरकारचे सदस्य, राजकीय पक्षांचे नेते, आसियानचे सरचिटणीस यांची भेट घेणार आहे.द्रमुक खासदार कनिमोळी यांच्या नेतृत्वाखालील**

शिष्टमंडळ काल ग्रीसमध्ये पोहोचलं. ग्रीसचा दौरा संपल्यानंतर हे शिष्टमंडळ ऑपरेशन सिंदूरबद्दल माहिती देण्यासाठी लाटविया आणि स्पेनला भेट देईल. शिवसेना खासदार श्रीकांत शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळानं काँगोच्या राष्ट्रीय सभेच्या परराष्ट्र व्यवहार समितीचे अध्यक्ष बर्थोल्ड उलुंगू यांची भेट घेतली. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळ काल दक्षिण आफ्रिकेत पोहचलं. फ्रान्समध्ये, भाजप खासदार रविशंकर प्रसाद यांच्या नेतृत्वाखालील सर्वपक्षीय शिष्टमंडळानं काल फ्रेंच संसद सदस्यांची भेट घेतली. काँग्रेस खासदार शशी थरूर यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळ पनामाला पोहोचलं आहे.

---------------------------------------------------------

राज्य पाऊस

राज्यात गेले तीन दिवस झालेल्या मुसळधार पावसामुळे प्रचंड नुकसान झालं आहे. अनेक जिल्ह्यांमध्ये पावसामुळे आठ जणांचा मृत्यू झाला आहे. पुण्यात तीन, जालना दोन तर मुंबई, रायगड आणि अहिल्यानगर मध्ये प्रत्येकी एकाचा मृत्यू झाला असून दोन जण जखमी झाले. मृतांच्या कुटुंबियांना तात्काळ मदत देण्याचे आणि पिकांच्या नुकसानीची भरपाई देण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत दिले आहेत. दरम्यान, महाराष्ट्रातील पावसाळ्याची परिस्थिती अजूनही गंभीर आहे. पुरामुळे सामान्य जनजीवन विस्कळीत झाले आहे. राज्यात गेल्या २४ तासांत काही ठिकाणी पावसाचा जोर कायम आहे. अकोल्यात काल सुमारे १३० मिलीमिटर पावसाची नोंद झाली. मुसळधार पावसामुळे रस्ते जलमय झाले त्यामुळे अनेक घरात, पाणी शिरलं. साहित्याचे नुकसान झाले. काही ठिकाणी झाडे उन्मळून पडल्याने वाहनांचं नुकसान झालं. शहरात काही भागांत वीज पुरवठा खंडित झाला. पावसामुळे फळबागा, ज्वारी, कांद्यासह अन्य पिकांचं नुकसान झालं आहे. बुलढाणा जिल्ह्यात खामगाव तालुक्यातील घारोड ढगफुटी सदृश्य पाऊस पडल्याने नदी आणि परिसरातील ओढ्यांना मोठ्या प्रमाणात पूर आला आसून शेतीचं मोठ्या प्रमाणात नुकसान झालं आहे. दरम्यान, नागपुरात देखील सध्या मेघगर्जनेसह हलका पाऊस पडायला सुरवात झाली आहे.

---------------------------------------------------------

सावरकर यांची जयंती

आज स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांची जयंती साजरी करण्यात येत आहे. त्यानिमित्त देशभरात विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात येत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सावरकर यांना आदरांजली अर्पण केली आहे. वीर सावरकर यांची स्वातंत्र्य चळवळीतील अदम्य धैर्याची आणि संघर्षाची गाथा कृतज्ञ राष्ट्र कधीही विसरू शकत नाही. विकसित भारताच्या निर्मितीमध्ये त्यांचे बलिदान आणि देशासाठीचे समर्पण मार्गदर्शक ठरत राहील अशा शब्दात पंतप्रधानांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. मुंबई विद्यापीठातील स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या जीवन कार्याला समर्पित असलेल्या अभ्यास आणि संशोधन केंद्राचं काल राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांच्या हस्ते उद्घाटन झालं. स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्याशी संबंधित ठिकाणांना जोडणारी अखिल भारतीय सावरकर पर्यटन साखळी तयार करावी, असं आवाहन राज्यपालांनी यावेळी केलं. सावरकर जयंती निमित्त नागपुरातील शंकर नगर चौक इथल्या त्यांच्या पूर्णाकृती पुतळ्याला नागपूर महानगर पालिका, स्वातंत्रवीर सावरकर स्मारक समिती, कठाळे परिवार प्रतिष्ठान, चित्पावन ब्राह्मण संघ नागपूर, अखिल भारतीय ब्राह्मण महासंघ नागपूर, हिंदू महासभा तसेच विविध सामाजिक संघटनेच्या वतीने पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

--------------------------------------------------------

बोगस मिश्र खत

भंडाऱ्यामध्ये लाखनी इथं कृषी तंत्रज्ञान माहिती केंद्रात सुमारे १२९ मेट्रिक टन बोगस मिश्र खतांचा साठा आढळून आला आहे. मिश्र खताच्या नमुन्याची अमरावती मधल्या खत नियंत्रण प्रयोगशाळेत तपासणी केली असता नमुने अप्रमाणित ठरले आहेत. विशेष म्हणजे संबंधित खत उत्पादन कंपनी आणि वितरक तसेच विक्रेत्यांकडे महाराष्ट्र राज्यातील खत उत्पादन आणि विक्री संबंधीचे कोणतेही परवाने नसल्याची धक्कादायक बाबही समोर आली आहे.

--------------------------------------------------------

ठाणे-नागपूर 'स्मार्ट बस'

एसटी महामंडळाच्या ठाणे-नागपूर दरम्यान चालवण्यात येणाऱ्या 'स्मार्ट बस'मध्ये बसवण्यात आलेल्या आयटी सुरक्षा प्रणालीची पाहणी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज ठाणे इथं केली. राज्य परिवहन महामंडळाच्या बस मधून प्रवास करणाऱ्या सर्वसामान्य प्रवाशांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य आहे, त्यासाठी 'एआय' तंत्रज्ञानावर आधारित सुरक्षा प्रणाली स्मार्ट बसगाड्यांमधे

लावण्यात येणार असल्यानं या नवीन बसगाड्या प्रवासाकरिता अधिक सुरक्षित असतील, असा विश्वास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी व्यक्त केला. यावेळी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, एसटीचे अधिकारी उपस्थित होते.

---

विक्रम मिसरी

परराष्ट्र सचिव विक्रम मिसरी यांनी अमेरिकेचे अंडर सेक्रेटरी जेफ्री केसलर यांची वॉशिंग्टन इथं आज भेट घेतली. दोन्ही देशात महत्त्वाच्या तसंच तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात सहकार्य वाढवण्याबाबत दोघांमधे चर्चा झाली. भारत आणि अमेरिका यांच्यातले व्यापार संबंध अधिक दृढ व्हावेत यासाठी भारत-अमेरिका धोरणात्मक व्यापार संवाद करण्याबाबतही दोघांमधे चर्चा झाली. विक्रम मिसरी हे तीन दिवसांच्या अमेरिका दौऱ्यावर असून ते ट्रम्प प्रशासनाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची भेट घेणार आहेत.

---

आयपीएल

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत उद्या पहिल्या क्वालीफायर सामन्यात पंजाब किंग्स आणि रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरु यांच्यात सामना होणार आहे. तर, एलिमेनिटर सामना गुजरात टायटन्स आणि मुंबई इंडियन्स दरम्यान होणार आहे. काल लखनऊ इथं झालेल्या शेवटच्या साखळी सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने लखनौ सुपर जायंट्सचा पराभव केला.

---

लोकशाही दिन

नागपूर महापालिकेच्या मुख्यालयातील डॉ.पंजाबराव देशमुख स्थायी समिती सभागृहात येत्या 2 जून रोजी "लोकशाही दिन" सकाळी 10 वाजता आयोजित केला आहे. यात जनतेच्या तक्रारी, अडचणी व गाऱ्हाणी ऐकल्या जातील तसेच त्यांचा निपटारा केला जाईल. लोकशाही दिनाला सर्व कक्ष प्रमुख व झोन क्रमांक 1 ते 10 मधील सर्व सहायक आयुक्तांनी माहितीसह उपस्थित राहावे, असे निर्देश महापालिका आयुक्त डॉ.अभिजीत चौधरी यांनी दिले आहेत.

---

नवीन व्हिसा

परदेशी विद्यार्थ्यांची नवीन व्हिसासाठी मुलाखत घेण्याची प्रक्रिया थांबवावी, असं अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबियो यांनी अमेरिकन दुतावास आणि काऊन्सलर

**कार्यालयांना सांगितलं आहे. यामुळे अमेरिकेतल्या शाळा, महाविद्यालयात इतर देशातल्या विद्यार्थ्यांना प्रवेश मिळण्यात मर्यादा येणार आहेत. यापूर्वी ट्रम्प प्रशासनानं हावर्ड विद्यापीठाला परदेशातल्या विद्यार्थ्यांची नोंदणी करून घेऊ नये, असं सांगितलं होतं.**

**------------------------------------------------------**